एम.जे.सी. क्र.२४३/२०२४

सविता सातारकर –वि.– शिवाजी निळे.

नि.क्र. ५२ लगत

**<u>गैरअर्जदारातर्फे सा.क्र. १ चा उलटतपास अर्जदाराचे विधीज्ञ श्री. एस. पी. तळोकार यांचेमार्फत शपथेवर सुरु–</u>**

५. हे म्हणणे खरे आहे की, नारायण पांडुजी निळे माझे वडील होते व ते मयत झालेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई सुध्दा मयत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही एकुण दोन भाऊ व एक बहीण आहोत. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार सविता सातारकर माझी बहीण आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेल्या पुराव्याच्या शपथपत्रात अर्जदार ही माझ्या आई वडीलांची वारस नसल्याबाबतचा कुठेही उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेल्या जबाबामध्ये अर्जदार ही माझ्या आई वडीलांची वारस नसल्याचा कुठेही उल्लेख नाही.

६. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या बहीणीविरुध्द दिवाणी दावा दाखल केलेला आहे व माझ्या बहीणीने सुध्दा मालमत्तेबाबत माझ्या विरोधात दिवाणी दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या बहीणीने दाखल केलेल्या दाव्यात न्यायालयातने तिला वारसपत्र देण्याबाबतची कोणतीही प्रार्थना केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, वारस प्रमाणपत्र कोठे आणि कशाच्या बाबतीत वापरायच याच्या बद्दल मी माझ्या जबाबात उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वारस हक्क प्रमाणपत्र कुठे वापरायचे याबाबतचे नियम ठरविण्याचा अधिकार मला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही तिघेही भाऊ बहीण आमच्या आई वडीलांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी माझ्या बहीणीने सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणात माझ्या बहीणीने कुठल्याही मालमत्तेचा उल्लेख केलेला नाही व कोणतीही मालमत्ता प्राप्त करण्यासाठी प्रार्थना सुध्दा केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या नावाची मालमत्तेमध्ये नोंदणी होतांना मी कोणतीही नोटीस माझ्या बहीणीला दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझी बहीण वारसदार असून खोटे पुरावे तयार करण्याच्या उद्देशाने मी खोटा जबाब व खोटा पुरावा दाखल केलेला आहे.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत
स्वा/-
**(एन. डी. मेश्राम)**
दि.न्या.क.स्तर, शेगांव कोर्ट क्र.१ ले,
दि. २०.०२.२०२६

माझे समक्ष
स्वा/-
**(एन. डी. मेश्राम)**
दि.न्या.क.स्तर,शेगांव कोर्ट क्र.१ ले,
दि. २०.०२.२०२६